

# भाऊबीज

लेखक- अनिल अनंत वाकणकर,
श्रीवर्धन, जिल्हा रायगड



# भाऊबीज

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# भाऊबीज

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

भाऊबीज (लघुकादंबरी)

लेखकाचे संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

Email-aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.


This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ नोव्हेंबर २०१८ (भाऊबीज)



- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## लेखकाचा परिचय




संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

वाचना संबधी:- गेली जवळपास ४० वर्षे अनेक प्रकारची पुस्तके वाचली. त्यातल्या त्यात कांदबरी हा प्रकार जास्त आवडीचा. योगिनी जोगळेकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, रणजित देसाई हे लेखक जास्त आवडीचे. श्रीवर्धन येथे वाचनालयात उपलब्ध असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्या वाचल्या आहेत. या शिवाय समर्थ रामदास स्वामींचे सर्व वाङ्मय, प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले यांची प्रवचने या अंगाचे वाचनही आवडीचे आहे.

**स्वत:चे लेखन:-** समर्थ रामदास स्वामींनी याला किर्तन भक्ती असे नांव दिले आहे. आपण जे जे वाचले आहे त्यातले जे आकलन झाले ते स्वत: जवळ न ठेवता दुसऱ्याला सांगणे ही एकप्रकारची किर्तन भक्तीच आहे. हल्लीच जागतिक पर्यावरण दिनाच्या मुहूर्तावर माझी वृक्ष मंदिर ही कादंबरी ई साहित्य प्रतिष्ठान द्वारे प्रकाशित झाली आहे. ई साहित्य प्रतिष्टान तर्फ माझी दुर्गा कवच आणि ब्रह्मणस्पती विनायक या दुसऱ्याही दोन लघु कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

तरीही मी दोन प्रवास वर्णन, तिन कथा लिहील्या आहेत. हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/ या ब्लॉगवर उपलब्ध आहे.


ब्रह्मणस्पती विनायक
अनिल अनंत वाकणकर


।। वृक्ष मंदिर ।।
अनिल अनंत वाकणकर


अनिल अनंत वाकणकर
।। दुर्गा कवच ।।

# १

आज भाऊबीजेचा दिवस आहे. सुकन्या हॉलमध्ये बसुन भाजी निवडत होती. जवळच छोटी वृंदा खेळण्यांबरोबर खेळत होती. तिच्यापेक्षा तिन वर्षांनी मोठा असलेला मदन अभ्यासाच्या टेबलवर बसून अभ्यास करीत असल्याचे दाखवत होता. परंतु त्याचे लक्ष दाराची बेल कधी वाजते याकडे होते. सुकन्या देखिल हाताने भाजी निवडत असली तरी तिचे देखिल लक्ष सारखे दाराकडे जात होते. तिला चिडवीण्याकरीता मदन आईला म्हणाला, आई! सारखं दाराकडे बघुन मामा लवकर थोडाच येणार आहे?

तू गप्प बस रे बोक्या! मला सांगतोस आणि तू काय करतोयस? तू देखिल मामाचीच वाटच बघतोयस नां? तोंडाने ती जरी असे म्हणून मदनचे बोलणे उडवून लावत असली तरी तिचे मन रंजीस आले होते. नेहमी बरोब्बर दहा वाजता हजर होणारा तिचा भाऊ आता बारा वाजले तरी अजून त्याचा पत्ता नव्हता. तिला आता खूप काळजी वाटू लागली. आईची तब्येत ठिक असेल नां? बाबा कसे असतिल? अजयला रजा मिळाली असेल की नाही? कां बसला काही अपघात झाला? तिच्या भोवती नाना प्रश्न फेर धरुन उभे राहिले आणि तिची काळजी वाढू लागली. तेवढ्यांत छोट्या वृंदाने भोकाड पसरले. ते ऐकुन सुकन्या तिच्यावर ओरडली.

मदन देखिल पुस्तकातले तेच तेच वाचुन कंटाळला होता. आई वृंदावर चिडलेली बघून मदन म्हणाला, आई! मामाचा राग तू वृंदावर काय काढतेस. ती कंटाळली आहे आणि आता मलाही भूक लागल्ये. मला जेवायला वाढ. सुकन्याला मदनचे म्हणणे पटले. वेळही खूप झाला होता त्यामुळे तिने मदनला जेवायला वाढले आणि वृंदाला भरवायला सुरवात केली. परंतु  तिचे त्यात लक्षच लागत नव्हते. आज मदनचे बाबा देखिल त्यांच्या बहिणीकडे दिप्तीकडे भाऊबीजेकरीता जळगांवला गेले होते.

बराच वेळ वाट बघून सुकन्याने चार घास खाऊन घ्यावे असे ठरवले. त्या करीता तिने ताट घेऊन डायनिंग टेबलवर ठेवले. तेवढ्यांत दारावरची बेल वाजली. ती बेल वाजवण्याची पध्दत ऐकून तिला खात्री झाली की, ज्याची ती एवढ्या आतुरतेने वाट बघत होती तो तिचा लाडका भाऊ अजयच आला आहे. ती हॉलमध्ये दाखल होते नाही तोच मदनने उघडलेल्या दारातुन अजय आत मध्ये आला.

काय रे अजय! किती ऊशीर? आई बाबा कसे आहेत? तुला एवढा उशीर का झाला? सुकन्याने एका दमात विचारले.

हो! हो! अग ताई! एकावेळी किती प्रश्न विचारतेस? घरातली सगळी मस्त आहेत आणि उशीरा बद्दल म्हणशील तर रत्नागिरी ते पुणे रस्त्याची पार चाळण झाली आहे. इतके खड्डे बापरे! कमरेची पार वाट लागली आहे. त्यामुळेच गाडीला उशिर झाला त्यातच वाटेत एक अपघात झाला आहे. त्यामुळे काही अंतर वाहतूक अगदी मुंगीच्या पावलांनी चालू होती. तेव्हा मला सर्वांत प्रथम कढत कढत पाण्याने आंघोळ करायची आहे. ते देखिल तुझ्याकडून चांगले तेलाने मालिश करुन घेऊन. म्हणजे प्रवासाचा थकवा दूर होईल. वर्षातुन एकदाच बहिणाकडून मालिश करुन घ्यायचा चान्स असतो. जेवण झाल्यावर चांगली ताणून देणार आहे मी.

अजय बरोबर बोलता बोलता तिने एकीकडे चहाला आधण ठेवले आणि तेल कोमट करुन त्यात उटणे घातले. अजयचा चहा पिऊन झाल्यावर त्याने मदनला आणि वृंदाला बरोबर आणलेला खाऊ दिला. सुकन्याच्या हातात एक पिशवी देत तो बोलला. हे घे ताई! आईने खास तुला आवडतात म्हणून नारळाच्या वड्या दिल्यात. शिवाय आमसुले, मोदकाची पिठी, कोकम आगळ, कोकम सरबत काय काय दिलेय. मला पण माहित नाही. तुच बघ काय आहे ते.

तेवढ्यात सुकन्याने रांगोळी काढुन पाट मांडला. अजयच्या हातातून पिशवी घेत ती म्हणाली, अरे! आईची माया आहे ती. त्यानंतर तिने अजयला पाटावर बसायला सांगितले.

अजय पाटावर बसून ताईकडून बसच्या प्रवासाने जाम झालेली पाठ रगडुन घेऊ लागला. त्यानंतर कढत कढत पाण्याने आंघोळ झाल्यावर त्याचा प्रवासाचा शिण दूर झाला.

*******

अजयची आंघोळ करुन झाल्यावर सुकन्याने त्याला जेवायला वाढले आणि नंतर स्वत:ही जेवायला बसली.  सुकन्याचे जेवण चालू असताना अजय हात न धुता तिच्याबरोबर गप्पा मारीत होता. मधेच तो मदनला म्हणाला, काय रे मदन! फटाके वगैर आणले कां नाही?

नाही नां मामा! आई म्हणते फटाके नाही उडवायचे. तू सांग नां मामा! फटाके नसतील तर दिवाळीची काय मजा? मदने रुसलेल्या स्वरात आईची तक्रार केली.

अरे! तुझ्या आईचे पण बरोबर आहे. फटाक्यांनी मोठा आवाज होतो, आग लागते. आजुबाजुला कोणी आजारी असेल, तर त्याला देखिल फटाक्यांच्या आवाजाचा त्रास होतो की नाही? तरीही तू म्हणतोस ते पण बरोबर आहे, फटाक्यांशिवाय दिवाळीची मजा नाही. अजयने दोघांचीही बाजू घेतली.

वाऽ रे वाऽ अजय! दोन्ही बाजुनी बोलतोयस! एकीकडे म्हणतोस फटाक्यांनी त्रास होतो आणि दुसरीकडे फटाक्यांशिवाय दिवाळी नाही असेही म्हणतोस! यातले खरे काय? आणि खोटे काय? सुकन्याने अजयला विचारले.

ताई तुझे म्हणणे बरोबर आहे, परंतु या छोट्या मदनला दिवाळीत फटाके उडवावे असे वाटणारच नां? आपल्या लहानपणी आपण किती फटाके फोडायचो ते आठवतेय नां? आपण असे करु आपण बिन आवाजाचे आणि कमी प्रदूषण करणारे फटाके आणूया! काऽय मदन चालेल नां? अजयने मदनला विचारले.

होSS! चालेल मामा! मदनने ताबडतोब उत्तर दिले. मामा बाहेर लावलेला आकाश कंदील बघितलास कां?

हो बघितला नां! तो तू केलायस की काय? कोणी शिकवला? छानचं आहे! अजयने भाच्याचे कौतुक केले.

मामा! आमच्या मॅडमनी शाळेत शिकवला. आम्हाला हा प्रोजेक्ट होता. मदनने माहिती दिली.

अरे अजय! घरचे कसे आहेत सगळे? तुझी नोकरी काय म्हणते? आता परमनंट झाला असशिल नां? सुकन्याने काळजीने विचारले.

ताई! घरचे सगळे मजेत आहेत. माझी नोकरी देखिल व्यवस्थित चालू आहे. हल्लीच मला नोकरीत कायम केले आहे. आज मी खूप आनंदात आहे. तुला माहित आहे यंदा मला पहिला आणि चांगला घसघशीत बोनस मिळालाय. तेव्हा आता यावर्षी भाऊबीज जोरात साजरी करुया. मी तुला तू म्हणशिल ती साडी घेणार आहे.

मामा! मला पण पोलिसच इन्स्पेक्टरचा ड्रेस घ्यायचाय! तू मला प्रॉमिज केलेले आहेस. लक्षात आहे नां? मदनने मामाला आठवण करुन दिली.

हो! हो! नक्कीच! तुला पोलिस इन्स्पेक्टरचा ड्रेस आणि वृंदालापण चांगला ड्रेस घ्यायचाय. शिवाय तुझ्या आजी आणि आबांना पण कपडे घ्यायचेत. तेव्हा ताई आता आपण मार्केटला जाऊया आणि मदनला फटाके आणि सर्वांना कपडे खरेदी करुया. अजयने आपला पुढचा बेत सांगितला.

अरे! पण तुला आराम करायचा होता नां! प्रवासाने थकला आहेस थोडावेळ आराम कर मग जाऊ मार्केटला. सुकन्याने काळजीने त्याला सांगितले.

नको आता मी एकदम फ्रेश आहे. तू मार्केटला जायची तयारी कर. आपण लगेचच जाऊया म्हणजे संध्याकाळी ओवाळणीकरीता वेळवर घरी परत येऊ. अजयने पुढे होणाऱ्या उशिराची जाणिव दिली.

*******

कसबापेठेतील ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटरमध्ये आज बरीच गर्दी दिसत होती. आज भाऊबीज असल्याने बऱ्याच भगिनी आज खरेदीला बाहेर पडल्या होत्या. अजय सुकन्या, मदन आणि वृंदासह दुकानात शिरला तेव्हा प्रत्येक काऊंटरवर गर्दी होती म्हणून अजय मदनसह दुकानच्या मालकांशी गप्पा मारीत बसला.



काय साहेब! काय खरेदी करताय! शेटजींनी आपुलकीने विचारले.

काही नाही, आज भाऊबीज आहे नां! बहिणीला साडी आणि भाच्यांना कपडे घ्यायचे आहेत.

किती पर्यंत बजेट आहे, जरा भारीतली साडी दाखवायला सांगु काय? शेटजींनी विचारले.

मामा! मला पोलिस इन्स्पेक्टरचा ड्रेस पण घ्यायचाय लक्षात आहे नां? मधेच मदनने आपले घोड दामटलं.

हो! हो! तुला पोलिस इन्स्पेक्टरचा ड्रेस घ्यायचाय तरं! असे त्याने मदनला सांगितले आणि शेटजींना तो म्हणाला ताईसाठी हजारभर रुपयांपर्यंतची चांगली साडी तिला दाखवां आणि या आमच्या भाच्याकरीता पोलिस इन्स्पेक्टरचा चांगला ड्रेसही दाखवा.

बऱ्याच घासाघिशी नंतर सुकन्याची साडी फायनल करुन झाली त्यानंतर मदनकरीता पोलिस इन्स्पेक्टरचा ड्रेस आणि वृंदाकरीता फ्रॉक अशी खरेदी करुन झाली. ताई साडी नीट चेक करुन घे बरकां! नंतर व्याप नको, अजयने ताईला सुचविले.

त्यावर शेटनी साहेब चेक करायची काही जरुरी नाही साडी एकदम उत्तम आहे असे सांगितले. तेथे खूप गर्दी असल्याने सुकन्याने शेटजींच्या शब्दावर विश्वास ठेऊन तशीच साडी घेतली अजयने साडीचे ११५०, मदनच्या ड्रेसचे ७०० आणि वृंदाच्या फ्रॉकचे ५०० असे एकुण २३५० शेटजींना दिले. शेटजींनी त्यावर दिवाळी बोनस म्हणून १० टक्के सूट दिली. अशाप्रकारे अजयने आणखी थोडे कमी करुन २१०० रुपये पेड करुन बील घेतले. त्यानंतर ते दुकानातुन निघाले. जाता जाता वाटेत मदनच्या पसंतीने थोडे बिन आवाजाचे फटाके घेतले.

संध्याकाळी मदनने अजयमामाच्या सोबत फटाके उडवले. अजयने आकाशकंदीलातील लाईट आणि दिव्यांच्या माळा चालू केल्या. थोड्यावेळाने सुकन्याने अजयला ओवाळले अजयने मगाशी खरेदी केलेली साडी ओवाळणी म्हणून घातली. सुकन्याने देखिल अजयला आधीच आणून ठेवलेला शर्ट आणि पॅंटपीसचे पॅकेट दिले. अजयने सुकन्याला नमस्कार केला. त्यानंतर न सांगताच मदनने आईला आणि मामाला नमस्कार केला.

*******

# २

अजय हॉलमध्ये बसून ताईने केलेल्या उपम्याचा समाचार घेत होता. बाजुलाच मदन देखिल आपली नाश्त्याची प्लेट घेऊन बसला होता समोर टि.व्हीवर कार्टुनचा चॅनेल लावलेला होता. मदन कार्टुन बघत एकीकडे नाश्ता करीता होता. मधुनच मामाबरोबर बोलत होता. समोरच्या कोचावर सुकन्या अजयबरोबर गप्पा मारीत बसली होती. त्यांच्या गप्पा चालू असताना दारावरची बेल वाजली.

बेलचा आवाज ऐकताच दार उघडण्याकरीता मदन धावत गेला. दार उघडल्यावर दारात आत्याला बघून तो खुश झाला. वेलकम दिप्ती आत्या! एकटीच आलीस दीदीला नाही आणलेस! असे म्हणून तो दारातुन बाजुला झाला. दारातुन मदनचे बाबा सुरेश आणि त्याची बहिण दिप्ती आत आले. आतमध्ये आल्यावर समोर अजयला पाहून सुरेश खुश झाला. कारण अजय बरेच दिवसांनी आला होता.

सुरेश भाऊबीजेच्या आदल्या दिवशी भाऊबीजेकरीता त्याची बहिण दिप्तीकडे गेला होता. उद्या मदनचा वाढदिवस असल्याने दिप्तीही त्याच्या बरोबर आपल्या माहेरी आली होती. दोघेही घरात शिरताच घरातले वातावरण एकदम बदलून गेले. सुरेश अजयच्या बाजुला गप्पा मारायला बसला, तर दिप्ती आपल्या वहिनीबरोबर फ्रेश व्हायला आणि गप्पा मारायला आतमध्ये गेली.

*******

सुकन्याच्या खोलीत दिप्ती आणि सुकन्या गप्पा मारीत बसल्या होत्या. दोघींचे उद्या मदनच्या वाढदिवसाचे प्लॅनिंग करणे चालू होते.

वहिनी! अजयने भाऊबीज काय दिली? दिप्तीने वहिनीला विचारले.

अग यंदा त्याला पूर्ण बोनस मिळाला त्यामुळे तो एकदम खूष होता. यंदा त्याने मला पाहिजे ती साडी खरेदी कर असे सांगितले. मला साडी तर घेतलीच शिवाय मदनला आणि वृंदालाही त्याने ड्रेस घेतले. त्याला आई बाबांना देखिल कपडे घ्यायचे आहेत.

बघु कशी साडी आहे ती! मलाही दादाने मस्त काठापदराची साडी घेतली आहे. वहिनी एक छान कल्पना मनात आली आहे. आपण उद्या मदनच्या वाढदिवसाला आपापल्या भाऊबीजेची साडी नेसुयात काय? तुला आणि मला आपापल्या भावाने भाऊबीजेला दिलेली साडी आपण उद्या नेसुया. त्या साडीला मॅचिंग होणारा ब्लाऊज आता माझ्याकडे आहे. दिप्तीने सांगितले.

दिप्ती कल्पना मस्तच आहे! मला खूप आवडली. माझ्याकडेही मॅचिंग ब्लाऊज सापडेलच. ही बघ अजयने मला घेतलेली साडी, सुकन्याने हातातली साडी दिप्तीच्या हातात देत म्हटले.

अय्या! छानच आहे. अशी साडी तुझ्याकडे नव्हतीच. मग ठरले तरं उद्या आपण याच साड्या नेसुया! मी माझी भाऊबीजेची साडी बॅग मधून काढते. आता आपण त्या साड्यांना फॉल बिडींग करुया म्हणजे उद्या गडबड होणार नाही. बोलता बोलता दिप्तीने गेस्ट रुम मधे असलेल्या आपल्या बॅगेतुन भाऊबीजेची साडी आणली.

वहिनी दोन्हीही साड्यांना मी बिडींग करते मग आपण एकमेकींच्या साडीला फॉल लावुया. चालेल नां! दिप्तीने विचारले.

अगं न चालायला काय झाले! ती बघ बिडींगची मशिन पॅसेज मध्ये आहे. तुझे बिडींगचे काम होईपर्यंत मी आपल्या सर्वांना चहा करते. नाहीतर आपल्या दोघींचे भाऊ वैतागतिल म्हणतिल नणंदा भावजयीच्या गप्पा संपतच नाहित. सुकन्या बोलली आणि किचनमध्ये चहा करायला गेली. दिप्ती देखिल दोन्ही साड्यांच्या घड्या घेऊन पॅसेजमधिल बिडींग मशिनकडे गेली.

सुरवातीला तिने स्वत:च्या साडीला बिडिंग केले. त्यानंतर तिने सुकन्याच्या साडीला बिडींग करण्या करीता साडी उलगडली. साडीमध्ये ब्लाऊज पिस आहे का हे तपासायला तिने सुरवात केली. तेव्हा तिच्या लक्षांत आले की, साडी पदरालाच थोडीशी विरलेली आहे. म्हणून ती हॉलमधिल मोठ्या प्रकाशांत साडी

तपासण्याकरीता घेऊन गेली. तिथे बसलेले अजय आणि सुरेश हा काय प्रकार आहे ते बघतच राहिले.

दिप्ती हा काय प्रकार आहे? ही अशी उलगडलेली साडी घेऊन काय फिरतेस? सुरेशने विचारले.

अरे दादा! काल अजयने वहिनीला दिलेली भाऊबीजेची साडी आहे ही! उद्या मदनच्या वाढदिवसाला आम्ही दोघी आमच्या भाऊबीजेचीच साडी नेसणार आहोत. म्हणून मी माझ्या आणि वहिनीच्या साडिला बिडींग करीत आहे. माझ्या साडीला बिडींग करुन झाले आणि मी वहिनीची साडी बिडिंग करीता घेतली तेव्हा मला ती थोडी विरलेली वाटली म्हणून मी इथे उजेडात नीट पहायला साडी घेऊन आले आहे. दिप्तीने सविस्तर स्पष्टीकरण दिले. तेवढ्यांत सुकन्या देखिल चहा घेऊन हॉल मध्ये आली.

दिप्ती काय झाले? साडीत काही प्रॉब्लेम आहे कां? हातातल्या ट्रेमधले चहाचे मग सुरेश आणि अजयला देत सुकन्याने विचारले.

हो नां! हे बघ नां वहिनी मला साडी थोडी विरलेली वाटतेय! दिप्तीने वहिनीच्या हातात साडी देत सांगितले.

हे बघं दिप्ती! आधी तू चहा घे मग आपण बघुया! असे म्हणून तिने दिप्तीच्या हातात चहाचा मग दिला आणि स्वत:ला देखिल चहाचा मग उचलला. सर्वांचा चहा पिऊन झाल्यावर दिप्तीने आणि सुकन्याने साडीची व्यवस्थित तपासणी केल्यावर त्यांना त्या साडीचा पदराचा मोठा भाग विरलेला आढळला. त्यामुळे ती साडी आता उदया नेसणे शक्य नव्हते. त्यामुळे दोघींचाही विरस झाला.

पण वहिनी! तू साडी बघुन घेतली नव्हतीस कां? दिप्तीने विचारले.

अगं! त्या दिवशी दुकानांत खूप गर्दी होती. त्यातच तो दुकानदार म्हणाला, साडीमध्ये काही प्रॉब्लेम नाही निर्धास्त घेऊन जां! म्हणून त्याच्यावर विश्वास ठेऊन घेतली झाले. त्यातच उशिर पण खूप झाला होता. पण आता काय करायचे? तो दुकानदार साडी बदलून देईल की नाही याचेच मला टेन्शन आहे. सुकन्या म्हणाली.

अगं! वां गं वा! कसा बदलून देणार नाही? आपण काय चिंचोके मोजलेत कां? आपण त्याला बदलून द्यायला लावुच. दिप्तीने सुकन्याला धीर दिला.

या विषयावर सगळयांची चर्चा झाली. सगळयांनी मिळुन असे ठरवले की, साडी घेऊन दुकानात जायचे आणि रितसर साडी बदलून मागायची. तो जर नाही म्हणाला तर काय करायचे ते तेव्हा बघुया.

********



# ३

ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटरमध्ये आज विशेष गर्दी नव्हती. अजय, दिप्ती, सुकन्या आणि सुरेश दुकानात शिरले ते थेट शेटजींच्या जवळ गेले. शेटजींनी त्यांचे तोंड भरुन स्वागत केले.

या साहेब! या वहिनी!! काय खरेदी आहे? साडी घेताय? कां ड्रेस?

नाही शेट आज खरेदी नाही. परवा आम्ही तुमच्याकडून एक साडी नेली होती. ती खराब झालेली साडी आहे. हे पहा हे त्याचे बील आहे. सुकन्याने साडी आणि हातातले बील पुढे केले.

मॅडम आम्ही एकदा विकलेला माल परत घेत नाही किंवा बदलून देत नाही. हे पहा तसे बीलावर आम्ही छापले देखिल आहे. तुम्ही घेतानाच बघून घ्यायला पाहिजे होती. असे म्हणून शेठजींनी बीलाच्या पाठिमागे छापलेली सूचना वाचुन दाखविली.

परंतु शेट! जेव्हा तुम्ही आम्हाला बिल देता तेव्हा तर ही तुमची सूचना दिसत नाही. बिलाच्या पाठिमागे छापलेली सूचना आम्ही खरेदीच्या आधी कशी वाचणार. तुम्ही तसा बोर्ड दुकानात लावायला हवा होता. आम्हीतर ही साडी वापरलेली देखिल नाही. फक्त उलगडून बघितली आहे. तरी तुम्ही म्हणता साडी बदलून देणार नाही हे कसे काय? आता सुरेशने मधे तोंड घातले.

हे पहा साहेब! आम्ही एकदा विकलेला माल परत घेत नाही हा आमचा नियम गेली अनेक वर्षे चालू आहे. त्यामुळे साडी परत बदलून देण्याचा प्रश्नच नाही. कारण मग ती वहिवाटच होऊन जाईल. कोणीही येईल साडी, ड्रेस बदलून मागत राहील. आतासुध्दा तुम्ही साडी घेतल्याला तिन चार दिवस झाले आहेत. लगेचच परत आणली असतीत तर कदाचित घेतली असती परंतु आता ते शक्य नाही. तुमची दुसरी काही खरेदी असली तर बोला. शेटजींनी सुरेशचे आणि सुकन्याचे म्हणणे उडवून लावले आणि ते दुसऱ्या गिऱ्हाईकाकडे वळले.

शेटजी! तुमचे हे उत्तर फायनल आहे. बघा अजुन विचार करा. सुरेशने परत एकदा शेटजींना विचारले.

हो! हो! ! माझे हे फायनल उत्तर आहे! शेटजींनी निक्षून सांगितले.

ठिक आहे! मग आता आम्ही आमच्या मार्गाने जायला मोकळे आहोत. अशाप्रकारे शेटजींना बजावून सुरेशने सुकन्या, दिप्ती आणि अजय यांना बाहेर निघण्यास सुचवीले.

या प्रकाराने अजयचा मात्र मुड गेला. मोठ्या हौसेने त्याने आपल्या लाडक्या बहिणीला सुकन्याला आपल्या स्वत:च्या कमाईमधुन पहिली साडी घेतली होती. त्या खरेदितच घोटाळा झाला होता. अशा नाराज मुडमध्येच सर्वजण परत घरी गेले.

*******

रात्री जेवण झाल्यावर मदन आणि वृंदा झोपी गेले. त्यानंतर अजय, सुरेश, दिप्ती आणि सुकन्या यांची मिटींग साडी या विषयावर चर्चा करण्याकरीता बसली.

भावोजी! आता यावर काय मार्ग काढायचा मला तर काहीच समजत नाही. अजय म्हणाला.

अजय! एवढा निराश होऊ नकोस! आपण यातुन काहीतरी मार्ग निश्चितपणे काढुच! याची मला खात्री आहे. सुरेशने ठामपणाने सांगितले.

दादा! माझ्या डोक्यात एक आयडिया आल्ये. सांगू काय? दिप्तीने विचारले.

अग विचारतेस काय? सांगून मोकळी हो! सुकन्याने दिप्तीला पाठिंबा दिला.

अग वहिनी! आपले सर्वांचे व्हॉटस् अँपचे ग्रुप आहेत त्यात ही घटना तपशिला सह टाकायची म्हणजे सर्वजण त्या शेटला विचारायला लागतिल. मग तो आपोआपच आपल्याला साडी बदलून देईल. कशी वाटतेय आयडिया? दिप्तीने विचारले.

दिप्ती! तुझी कल्पना चांगली आहे. परंतु आपण डायरेक्ट ग्रुपवर पोस्ट न टाकता आधी आपण तसे करणार असल्याची कल्पना त्या शेटजींना द्यायची म्हणजे कदाचित आधीच त्यांना उपरती होऊन आपले काम होऊन जाईल. सुरेशने आपले मत मांडले.

हे मला योग्य वाटते. म्हणजे आपले काम लवकर होईल आणि मी देखिल निश्चिंत मनाने घरी परत जाईन. अजयने आपले मत दिले.

मग त्याकरीता त्या शेटजींना कसे सांगायचे? फोन करायचा कां? कां पत्रच पाठवु यां! सुकन्याने विचारले.

सुकन्या तुझी पत्र पाठविण्याची कल्पना मला योग्य वाटते. आपण पत्र स्पीड पोस्टने पाठवुया! म्हणजे आपल्याला त्याची पोच पण मिळेल. तर मग ठरले आपण आताच पत्र लिहूया आणि उद्या सकाळीच ते स्पीडपोस्टाने पाठवु म्हणजे ते उद्या दुपारपर्यंत त्या शेटजींना मिळेल. मग पहाच काय परिणाम होतोय तो. सुरेशने अनुकुल प्रतिसादाची खात्री दिली.

ताई! पत्र पाठवशिल ते अंतर्देशिय पत्रावर लिही आणि तेच अंतर्देशिय पत्र स्पीड पोस्टने पाठव. अजयने सूचवले.

अरे! पण अंतर्देशिय पत्रच कां? काही विशेष कारण आहे कां? दिप्तीने विचारले.

हो! कारण अंतर्देशिय पत्र स्पीड पोस्टने पाठविले की आपल्याला त्याच कागदाची पोच मिळते ज्यावर आपण आपल्याला पाहिजे तो मजकूर लिहिला आहे. अजयने स्पष्टिकरण दिले.

अरे! पण अजय! पाकिटातून पत्र पाठवले तरी त्याची पोच आपल्याला मिळणारच नां? आता सुरेशने आपली शंका विचारली.

भावोजी! आपले म्हणणे बरोबर आहे! परंतु ते पाकीट स्विकारणारा म्हणू शकतो त्या पाकिटात तुम्ही म्हणता तो कागद नव्हता. परंतु अंतर्देशिय पत्र पाठविल्यावर तो चान्सच रहात नाही. कारण पोस्टाचे स्पीडपोस्ट नंबरचे स्टीकर आणि शिक्के त्याच कागदावर येतात. अजयने पटेल असे स्पष्टिकरण दिले.

अजय! तुला असा काही अनुभव आलेला आहे कां? सुरेशने विचारले.

अगदी मलाच नाही. परंतु माझ्या मित्राच्या फॅमिलीमध्ये असा अनुभव आलेला आहे. तेव्हा त्यांच्या विरुध्द पार्टीने हा मुद्दा काढला होता म्हणून मला माहित आहे. अजयने सांगितले.

मग बरोबर आहे. अनुभव हा मोठा गुरु आहे. सुरेशने आपली प्रतिक्रिया दिली.

*******

आज बाजाराला साप्ताहिक सुटी असल्याने बाजारातली सर्व दुकाने बंद होती. तरीही अनेक दुकानांत त्यांचे मालक आपली हिशेबाची कामे करण्याकरीता दुकानात बसले होते. त्याकरीता दुकानाचा मुख्य दरवाजा बंद असला तरी दुसरा दरवाजा उघडुन आतमध्ये काम चालू होते.

कसबापेठेतील ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटरमध्ये देखिल अशाच प्रकारे त्या दुकानाचे मालक गोपाळदासशेट आपले हिशेबाचे काम करीत बसले होते. दुकानात एक नोकर तेवढा हजर होता. बाकीचे सगळे नोकर आज सुट्टीवर होते. हजर असलेला नोकर गोविंदा दुकानाच्या पुढच्या भागात साफसफाईचे काम करीत होता. तेवढ्यात बाहेरुन पोस्टमने आवाज दिला म्हणून तो टपाल घेण्याकरीता बाहेर गेला.

पोस्टमन! काय पत्र आहेत कां? द्या इकडे आज दुकान बंद आहे. गोविंदाने विचारले.

ही घ्या! आज पत्र नाहित फक्त वर्तमान पत्र आणि विम्याच्या नोटीसा आहेत. पण शेट कुठे आहेत? एक स्पीड पोस्ट आहे त्यांची सही लागेल. पोस्टमनने सांगितले.

या! असे आत मध्ये यां! मालक हिशेबाचे काम करीत आत बसले आहेत. असे म्हणून गोविंदाने पोस्टमनला शेटजी होते तिकडे नेले.

मालक पोस्टमन आलेत! आपली सही पाहिजे म्हणतायत! गोविंदाने शेटजींना सांगितले.

शेटजी! ही डिलीव्हरी स्लीप घ्या आणि इथे सह्या करा. पोस्टमनने सांगितले आणि आपल्या हातातली डिलीव्हरी स्लीप आणि पोचपावती शेटजींच्या पुढे सही करण्याकरीता दिली.

शेटजींनी स्पीड पोस्टने आलेले अंतर्देशिय पत्र उलट सुलट करुन बघितले आणि पोस्टमननी दिलेल्या कागदांवर सही केली.

*******

पोस्टमन निघुन जाताच शेटजींनी स्पीडपोस्टने आलेले अंतर्देशिय पत्र उघडले. ते वाचता वाचता शेटजींना घाम फुटला. शेटजींनी धापा टाकत गोविंदाला पाणी आणायला सांगितले.

गोविंदाने पाणी देता देता विचारले, मालक काय झाले? आपला चेहरा असा काय घाबरल्या सारखा कां दिसतोय?

अरे बाबा! गोविंदा! घात झाला आता पोस्टमनने दिलेल्या पत्रातल्या मजकूराने माझा बी. पी एकदम हाय करुन टाकलाय! शेटजी थकलेल्या आवाजात बोलले.

पण आहे तरी काय एवढे त्या पत्रांत? गोविंदाने विचारले.

हे घे! हे पत्र वाच! म्हणजे तुला कळेल माझा बी. पी का हाय झाला ते! शेटजींचा गोविंदा हा अतिशय विश्वासाचा आणि जुना नोकर होता म्हणून त्यांनी त्याला आत्ता आलेले ते पत्रच वाचायला दिले.

गोविंदाने ते पत्र उघडले आणि वाचायला सुरवात केली, त्यात मजकूर पुढिल प्रमाणे होता.

सुकन्या सुरेश कुळकर्णी,
४०१, रास्ता पेठ, पुणे
दिनांक- २२ नोव्हेंबर २०१७
मोबाईल क्र. *xxxxxxx564*

माननिय संचालक,
ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटर,
कसबा पेठ, पुणे यांसी.

मी आपल्या दुकानातून दिनांक १६ नोव्हेंबर रोजी एक साडी खरेदी केली होती. त्या साडीचे बील माझ्याकडे आहे. त्या साडी मध्ये विणकामात दोष असल्याने मी ती आपणाकडे बदलून मागण्याकरीता

माझ्या पतिसह आले होते. परंतु आपण ती साडी आपण मला आपल्या दुकानाचे नियम सांगुन बदलून देण्यास नकार दिलात. आपणास समजावून सांगून देखिल आपण आपल्या नकारावर ठाम राहिलात. ही घटना माझ्या भावाने आपल्या मोबाईलमध्ये व्हीडीओ स्वरुपात रेकॉर्ड केली आहे.

तो व्हीडीओ आणि सर्व घटना सांगणारे माझे लिखित निवेदन मी माझ्या सर्व मैत्रिणिंना व्हॉटस् अँप आणि फेसबुकवर पाठविणार आहे. माझ्या सखी या व्हॉटस् अँप आणि फूसबुक ग्रुपवर सुमारे दोनशे मैत्रिणी आहेत. त्याचप्रमाणे माझ्या पतिचे देखिल असेच दोन ग्रुप आहेत त्यावर देखिल हे सर्व मी पोस्ट करणार आहे. त्या सर्वांना मी असे सुचवणार आहे की, असल्या खराब झालेला माल विकणाऱ्या दुकानांत जाताना विचार करा. त्याचप्रमाणे माझ्या पतिच्या मित्राची प्रिंटींग प्रेस आहे तो आम्हाला हा सर्व मजकूर हँडबिलाच्या स्वरुपात छापून देणार आहे. ती हँडबीले घेऊन मी आणि माझ्या मैत्रिणी आपल्या दुकानाबाहेर उभ्या राहून आपणाकडे येणाऱ्या सर्व ग्राहकांना वाटणार आहोत.

या पत्राद्वारे आपणाला ही पूर्व सूचना देत आहोत म्हणजे आयत्या वेळी फसवले असे वाटायला नको म्हणून हे पत्र पाठविले आहे.

आपणाकडून फसवली गेलेली आपली ग्राहक

**सौ सुकन्या सुरेश कुळकर्णी**

पत्र वाचुन गोविंदा देखिल अवाक झाला आणि उस्फूर्तपणाने बोलला, बापरे! शेट हा तर मोठा बॉंबच लावलाय या सुकन्या ताईंनी!

हो नां! माझीही नेमकी हीच प्रतिक्रिया होती. माझ्या डोळयासमोर आपल्या दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांना परत फिरवणारी ती बाईच दिसत होती. आता काय करायचे हा मोठा प्रश्न आहे. शेटजी चिंतेच्या सुरात बोलले.

पण मालक! त्यांनी अजुन काही कारवाई सुरु केलेली नाही! तेव्हा जर घाई केली तर हे आपण टाळु शकतो! त्या पत्रात त्यांचा मोबाईल नंबर आहे त्या फोनवर फोन केला तर आपण काहीतरी मार्ग काढू शकतो. गोविंदाने आपले मत दिले.

अरे! खरंच की! या पत्रानी माझं डोक बधिर झाले होते. आता लगेच फोन करतो. आपण असे करु! आधी तू त्यांच्याशी बोलून त्यांचा प्रतिसाद कसा आहे तो बघ. नंतर मी बोलतो. असे म्हणून त्यांनी पुढ्यातला फोन उचलला आणि सुकन्याचा नंबर डायल करायला सुरवात केली.

*******

अजय आणि दिप्ती आल्याने आज सुरेशने देखिल रजा घेतली होती. त्यामुळे आज सुकन्याने पावभाजीचा बेत केला होता. ती आणि सुकन्या त्याची तयारी करत होती. सुरेश आणि अजय किचन मध्येच बसून त्यांच्याशी गप्पा मारीत होते. त्यांच्या गप्पा रंगात आलेल्या असताना सुकन्याचा मोबाईल वाजु लागला. तिने नंबर बघितला तो अनोळखी लँडलाईनचा नंबर होता. त्यामुळे ती फोन उचलायचा किंवा नाही याचा विचार करत होती. तेव्हा सुरेशने विचारले, काय झाले? फोन का घेत नाहिसं!

बघां नां! नंबर ओळखीचा नाही! घेऊ कां नको याचा विचार करतेय! सुकन्या विचारात पडली होती.

बघु! इकडे दे फोन! अग हा पुण्यातला नंबर आहे. त्या साडीवाल्या शेटचा फोन असेल! मी बेट लावतो! थांब आपण खात्रीच करु! तिथपर्यंत वाजु दे फोन. ते बील कुठे आहे? त्यावर फोन नंबर असेल.

थांबा! मी बिल आणते! असे म्हणून ती बील आणायला गेली. ती बिल घेऊन येईपर्यंत फोन कट झाला. परंतु परत वाजायला लागला. परत तोच नंबर होता.

सुरेशने बीलावरचा फोन नंबर आणि मोबाईलवर आलेला फोन नंबर चेक केला. फोन साडीच्याच दुकानातुन आला होता याची आता खात्री झाली होती. त्याने सुकन्याला फोन रिसिव्ह करायला सांगितला. त्याने फोन स्पीकरवर टाकण्याची सूचना केली. त्याप्रमाणे सुकन्याने फोन स्पीकरवर ठेवुन संभाषण सुरु केले.

हॅलो! कोण बोलतेय? सुकन्याने विचारले.

मॅडम मी गोविंदा! ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटरमधुन बोलतो आहे. आपल्याशी आमच्या शेटना बोलायचे आहे. फोनवर गोविंदाने विचारले.

ठिक आहे! द्या त्यांच्याकडे काय बोलायचे आहे त्यांना? सुकन्या जरा रागातच बोलली.

हॅलो सुकन्यामॅडम! मी गोपाळदास ट्विंकल रेडीमेड आणि साडी सेंटरचा मालक बोलतोय! आपला लेटर मला मिळाला. त्या संदर्भात मला आपल्याशी बोलायचे आहे. मी आपल्या घरी कधी येऊ शकतो? गोपाळदास शेटनी नम्रपणाने विचारले.

हॅलो शेट! आपल्याला काय बोलायचे ते आपण त्या दिवशी दुकानात बोललातच की! आता माझ्या घरी येऊन काय बोलणारं! मी काय करणार आहे ते तुम्हाला लेटर मध्ये कळवले आहेच की. सुकन्याने गुश्यातच उत्तर दिले.

मॅडम! रागावु नका! आपण म्हणाल तेव्हा मी आपल्या घरी येईन. शेटजींनी परत अजीजी करत विनवले.

ठिक आहे! आता माझे पती घरी नाहीत कामावर गेले आहेत. ते आले की, त्यांना विचारुन सांगते. सुकन्याने नेमकी वेळ सांगायचे टाळले. किंवा शेटजी किती घाबरलेत याचा अंदाज घेण्यासाठी टाळा टाळ केली.

ठिक आहे मॅडम! मी आपल्याला परत फोन करतो! किती वाजता करु? शेटजींनी परत एकदा विनवणी केली.

तुम्ही असे करा, मी माझ्या पतींशी फोनवर बोलते त्यानंतर म्हणजे तासाभराने तुम्ही परत फोन करा. मग मी त्यांचे काय म्हणणे आहे ते कळवते.

काय गं ताई! भावोजी तर इथेच बसलेले आहेत, मग ते कामावर गेले आहेत असे खोटे का सांगितलेस? अजयने उत्सुकतेने विचारले.

त्याचे काय आहे अजय! ते शेट कीती काकुळतीला आलेत याची मी परिक्षा पाहत्येय. शिवाय आपल्याला गेल्या दोन दिवसात जो मनस्ताप झाला आहे तेवढा त्यांना देखिल व्हायला हवाच नां? शिवाय आपल्यालाही पुढचे धोरण ठरविता येईल.

बरोबर आहे वहिनींचे. दिप्तीने सुकन्याला दुजोरा दिला.

हे पहा सुकन्या आपण देखिल तुटेपर्यंत ताणायचे नाही. नाहीतर तेलही गेले आणि तुपही गेले असे व्हायला नको. सुरेशने आपले मत नोंदविले.

तर मगं आता थोड्याच वेळांत परत त्या गोपाळदास शेटचा फोन येईल त्यांना किती वाजता बोलवायचे ते आता ठरवा. ते शेट येऊन एकदा हे प्रकरण मिटले की मी देखिल जायला मोकळा होईन. अजयने आपल्याला जायची घाई आहे हे देखिल त्यातल्या त्यात सूचवले.

मला वाटते सुकन्याने मी कामाला गेलोय असे सांगितले आहे म्हणून संध्याकाळी पांच वाजता त्यांना बोलावुया आणि दुसरे म्हणजे आपण जास्ती ताणूया नको. आपल्याला साडी बदलून मिळाली की, आपले काम झाले. सुरेशने आपले मत मांडले.

दादा! नुसती साडी बदलून दिली म्हणजे झाले नाही बरं का! त्या शेटना ही बिलाच्या पाठीमागे छापलेली जाचक अट काढुन टाकायला लावायची. त्याशिवाय दुकानात देखिल मोठ्या अक्षरांत तशा अर्थाचा बोर्ड लावायला लावायचा. दिप्तीने मौलिक सूचना केली.

ठिक आहे तर मगं! आता त्या गोपाळदास शेटजींचा फोन आला की, त्यांना संध्याकाळी पाच वाजता यायला सांगते. सुकन्याने वेळ फिक्स केली.

*******

संध्याकाळचे पांच वाजले होते. अजय, सुरेश, दिप्ती आणि सुकन्या हॉलमध्ये शेटजींची वाट बघत बसले होते. सुरेश हातात एक कागद घेऊन तपासण्याचे नाटक करीत होता. तेवढ्यांत दारावरची बेल वाजली. ती ऐकुन सुकन्या उठली आणि बहूदा शेटजीच आले असतिल मीच दार उघडते असे म्हणून दार उघडायला गेली.

दारात खरोखरच गोपाळदास शेटजी आणि त्यांचा नोकर गोविंदा साड्यांचा गठ्ठा घेऊन उभा होता. त्यांचे स्वागत करीत सुकन्या म्हणाली, या शेटजी! आज आमच्या गरिबाच्या घराची कशी काय वाट चुकलात? त्यानंतर तिने बाजुला होऊन शेटजींना आत मध्ये यायला वाट दिली. ते आत मध्ये येऊन स्थानापन्न झाल्यावर पाणी वगैरे देऊन झाल्यावर सुरेशने विचारले, काय शेट! कसे काय येणे केलेत?

अरे साहेब! आपल्या या सुकन्याताईंनी पाठविलेला लेटर संबधात आपल्याला भेटायला आलो आहे. मी काही तुम्हाला साडी बदलून देणार नाही असे कुठे म्हटले होते? शेटनी आल्या आल्याच शरण आल्याचे निशाण दाखवले. आपण कसे काय आहात?

हे काय माझ्या मित्राने हा हँडबीलाचे प्रुफ तपासायला पाठविले आहे ते तपासतो आहे. असे म्हणून तो कागद सुरेशनी शेटजींच्या हातात दिला.

गोपाळदास शेटजींनी तो कागद वाचताच परत त्यांचे पालपिटेशने वाढले. तो कागद आपल्या हातातच ठेवत शेठनी बरोबर आलेल्या गोविंदाला जवळ बोलावले आणि साड्यांचा गठ्ठा समोर आणायला सांगितले.

हे पहा सुकन्या ताई! आपण आपल्याला पसंत पडेल ती साडी यातुन पसंत करा आपल्याला साडी बदलून देण्याकरीताच मी येथे आलो आहे. मात्र आपण ती व्हॉटस् अँप आणि फेसबुकवर करणार असलेली पोस्ट टाकू नका ही विनंती करायला मी आलो आहे.

ठिक आहे! मी नाही करणार तशी पोस्ट! परंतु माझी एक अट आहे. आपण जी बिलाच्या पाठिमागे छुपी अट छापली आहे ती सुधारली पाहिजे आणि नुसती बिलावर न छापता ती मोठ्या अक्षरांत दुकानात देखिल लावायला पाहिजे. आहो मी आणलेल्या साडीची फक्त घडी मोडून फॉल बिडींग करता उघडली होती. परंतु तुम्ही

काही ऐकून घ्यायलाच तयार नाही. म्हणून मला नाईलाजाने हा मार्ग पत्करावा लागला.

ताई! मी देखिल ती अट उगाचच टाकली नाही. आहो! अनेक गिऱ्हाईके साडी वापरुन आठ पंधरा दिवसांनी ती परत करायला येतात तेव्हा ती वापरलेली साडी कशी बदलून देणार? शेटजींनी आपली अडचण सांगितली.

परंतु शेट! तुमच्या दुकानातुन साडी घेतली आणि ती धुतल्यानंतर आटली, विरली किंवा रंग गेला तर तुम्हाला बदलून द्यायला नको पूर्ण किंमत देऊन ग्राहकाने का भुर्दंड सोसायचा हा देखिल अन्यायच नाही काय? सुप्रिया देखिल मागे हटायला तयार नव्हती.

हे बघ ताई! आधी तू तुझी साडी बदलून घे. उगाच जास्त ताणण्यांत मजा नाही. आणि ते शेटजी तु म्हणतेस ती अट मान्य करतिल याची मला खात्री आहे. कारण त्यात चुकीचे काहीच नाही. होय नां शेट? अजयने तडजोडीचा मार्ग सूचवला.

ठिक आहे! आधी साडी पसंत करु यां! दिप्ती! ये साडी पसंत करायला! असे म्हणून सुकन्याने दिप्तीच्या मदतीने एक साडी पसंत केली. दोघींनीही पूर्ण साडी उघडून तपासली आणि त्यानंतरच फायनल केली.

साडी पसंत केल्यावर सुरेशने ती साडी बघितली त्यावरचे किमतीचे लेबल पाहिले तर साडीची किंमत जास्त म्हणजे पंधराशे रुपये होती. सुकन्या तू ही साडी पसंत केलीस परंतु ही साडी पंधराशेची आहे अजयने घेतलेल्या त्या डिफेक्टीव्ह साडीची किंमत तर ११५० रुपये होती. तेव्हा आता आपल्याला साडे तिनशे रुपये द्यावे लागतिल.

नाही! नाही साहेब! आपल्याला जास्त पैसे द्यायची जरुरी नाही. ताईंनी माझे म्हणणे ऐकले यातच सगळे आले. शेटजींनी घाई घाईने आपले मत मांडले.

नाही! नाही शेटजी! तसे नाही! आपले नुकसान करुन मला ही साडी नकोय! सुकन्याने आपली नाराजी स्पष्ट केली.

ताई! या साडीची किंमत जरी १५०० असली तरी त्यावर २० टक्के डिस्काउंट चालू आहे तेव्हा त्या साडीवर ३०० रुपये तर सूट मिळेलच तेव्हा ५० रुपयांकरीता ती साडी परत बदलु नका. गोपाळदास शेटजींनी आपली भूमिका मांडली.

ताई! तुझ्या समाधानाकरीता मी हे पन्नास रुपये शेटजींना आत्ताच्या आत्ता देतो! मग तर झाले नां! असे म्हणून अजयने आपल्या पाकीटातुन पन्नास रुपये काढुन शेटजींच्या हातात ठेवले.

शेटजी आता या साडीचे सुधारीत बिल घ्यायला उद्या मी आपल्या दुकानांत येईन तेव्हा मला मी सांगितलेली सुधारणा झालेली दिसली की, लगेचच मी माझी व्हॉटस् अँप आणि फेसबुकवर पोस्ट करायची कल्पना सोडून देईन.

नक्कीच! मी आजच नवीन बीलबुके छापायला देतो. त्यात पुढच्या बाजुलाच योग्य कारण असल्याशिवाय विकलेली वस्तू परत बदलून मिळणार नाही असे छापून घेतो. मग तर काही हरकत नाही. शेटजींनी नम्रतेने विचारले.

हो आणि दुकानातही फ्लेक्स बोर्ड लावा! त्यावर दुकान सोडण्यापूर्वी आपण खरेदी केलेली वस्तू तपासून मगच दुकान सोडावे असे स्पष्ट शब्दात लिहा म्हणजे लोक बेसावध रहाणार नाहीत. दिप्तीनेही बोलायचा चान्स घेतला.

नक्कीच! या दोनही गोष्टी पूर्ण केल्याशिवाय मी उद्या दुकान उघडणार नाही ही खात्री बाळगां! शेटजींनी स्पष्ट शब्दांत आश्वासन दिले.

ठिक आहे तर! मी आपल्या शब्दावर परत एकदा विश्वास ठेवुन माझा व्हॉटस् अँप आणि फेसबुक वर आपल्या विरुध्द पोस्ट करण्याचा विचार मी रद्द करीत आहे. परंतु लक्षांत ठेवा मी अजुन बील आणि व्हीडीओ जपून ठेवणार आहे. तुम्ही जर आज ठरवल्याप्रमाणे वागलात नाही तर मात्र मी माझा विचार बदलेन. सुकन्याने आपल्या मात्रचा शेवटचा वळसा दिला.

*****समाप्त*****

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, अनिल वाकणकर यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत<br>
अध्यक्ष<br>
ई साहित्य प्रतिष्ठान